हाती घेण्यात आली. नगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी यांनी पोलिस प्रशासनाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या मदतीने शहरातल्या वेगवेगळ्या भागात ही मोहीम राबविली.

वी जयंतीचे औचित्य साधून ७ बाय १५ फुट आकाराची पोस्टर रांगोळी सतत ९ तास काम करून पूर्ण केली. संमेलनाचे अध्यक्ष माजी खासदार दत्ता मेघे, उद्घाटक खासदार सुप्रिया सुळे, प्रमुख

संघाचे राज्य सचिव सतीश जगताप, मनोहर बारसकर, किशोर सोनटक्के, रवींद्र वाघमारे प्रदीप गोमासे आदींनी याकरीता सहकार्य करीत शुभेच्छा व्यक्त केल्यात.

# सांस्कृतिक महोत्सवात विद्यार्थिनींद्वारे महिला सक्षमीकरणावर कार्यक्रम

**वर्धा** • प्रतिनिधी

महिला सेवा मंडळाद्वारा संचलित महिला आश्रम अध्यापिका विद्यालयाचा सांस्कृतिक महोत्सव नुकताच पार पडला. यामध्ये महिला सक्षमीकरणावर विविध कार्यक्रम सादर करण्यात आलेत.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रेरणेतून सुरु झालेल्या या संस्थेला उभारणी देण्याचे महत्वपूर्ण काम रमाबहन रुईआ यांनी केले. ज्या काळात महिलांना घराबाहेर पडण्याची बंदी होती. त्याच काळात स्त्री शिक्षणासाठी व स्त्रियांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी अध्यापिका विद्यालय कार्य करीत होते आणि आजही अविरतपणे करीत आहे. म्हणून यावर्षीच्या सांस्कृतिक कार्यक्रमात स्त्री सक्षमीकरणाच्या विषयावर आधारित विविध कार्यक्रम विद्यार्थिनींनी सादर केले.



कार्यक्रमाला महिला सेवा मंडळच्या अध्यक्ष नंदिनी मेहता, विद्यालयाच्या प्राचार्य वंदना भेंडे, माहिला आश्रम बुनियादी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक दिनकर पाटील, शहर परिसर बुनियादी प्राथमिकच्या मुख्याध्यापिका संध्या पुरी उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरवात 'ए गिरी नंदिनी' या नृत्याने झाली. नारी शक्ती महान हे द्वितीय वर्षाच्या छात्राध्यापिकांनी गायिलेले समूहगीत, ओल्ड टू न्यू गोल्डन इरा, महिलांवरील अत्याचारावर आधारित 'श्रद्धा नही सम्मान चाहिये' पथनाट्य, सुवर्णा भक्ता

पाहिजे. आज जेथे स्त्री सक्षमीकरण झाले आहे असे वाटत असतानाच पुन्हा सक्षमीकरणाची गरज नव्याने निर्माण झाली आहे. महिलांवरील अत्याचार दिवसेंदिवस वाढ झालेली दिसत आहे. यासाठी घराघरातून मुलांवर होणारे संस्कार, देशातील न्यायव्यवस्था मजबूत करणे गरजेचे आहे, असे सांगितले. संचालन प्रा. रीना परतेती यांनी केले. आभार प्रा. माधुरी देशमुख यांनी मानले. महिला आश्रम अध्यापिका विद्यालयाच्या प्रा. सुचिता राऊत